**MHKO120005312022**

**<u>कौ. हिं.म.सं.का.अर्ज क्र.२०/२०२२</u>**
(CNR No.MHKO110005312022)

## <u>निशाणी क्र.८ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी सदर अर्ज विरोधी पक्ष ( " वि.प." संक्षिप्त करिता ) यांच्या विरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी रक्कम ठरवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की,</u>**

०२. दि. १६/०७/२०२१ रोजी निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे हिंदु धर्मशास्त्रानुसार व रुढी परंपरेनुसार अर्जदार व वि.प.क्र१ यांचा विवाह संपन्न झाला. अर्जदाराच्या कुटुंबाने मोठ्या प्रमाणात लग्नावर खर्च केलेला आहे. वि.प.क्र.२ ते ६ हे अर्जदार व वि.प.क्र.१ चे नातेवाईक आहेत. वि.प.क्र.१ चे शिक्षण B.E.Civil झाले असुन तो जितेंद्रसिंग प्रा.लि. या कन्स्ट्रक्शन कंपनीत नोकरीस आहे व त्याला दरमहा रक्कम रु.५०,०००/- इतका पगार आहे. वि.प. च्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. लग्नानंतर अर्जदार ही वि.प. यांच्याकडे नांदण्यास गेली असता कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार हिचा वि.प. यांनी वेळोवेळी अर्जदार यांच्या कुटुंबाकडुन रक्कम रु.५,००,०००/- ची मागणी केली. तसेच कोणतेही कारण नसताना तिल घटस्फोट देण्याची धमकी दिली व तिच्यावर दबाव आणुन हिंदु मॅरेज पिटीशन क्र.३१०/२०२२ न्यायालयात दाखल करण्यास भाग पाडले. अर्जदार हिने केव्हाही पोटगीचा हक्क सोडलेला नाही. अशा प्रकारे वि.प. यांनी अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ केला आहे. अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ नाही. तसेच तिने स्वतःहुन वि.प. चा त्याग केला नाही.

०३. वि.प. यांनी अर्जदार यांच्या सदर अर्जास निशाण क्र.१० वर आपले म्हणणे सादर करून, वि.प. क्र.१ व अर्जदार यांचा विवाह झाल्याचा मजकूर मान्य करून इतर सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. वि.प. यांच्या कथनानुसार अर्जदार व तिच्या घरच्या लोकांनी वि.प. यांच्याकडे घटस्फोट घेवुन रिकामे होवुया अशी मागणी केली होती. अर्जदार हिने वि.प.क्र.१ यास 'तुम्ही घटस्फोट दया, नाहीतर तुमचेविरुध्द खोटी केस घालणार' अशी धमकी दिली होती. अर्जदार व वि.प.क्र.१ यांनी सहमतीने मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, कोल्हापूर येथे हिंदु मॅरेज पिटीशन क्र.३१०/२०२२ दाखल केला होता. अर्जदार हिने फक्त १० दिवस वि.प.क्र.१ सोबत संसार केला आहे. त्यानंतर दि.२७/०७/२०२१ रोजी अर्जदार ही आपले माहेरी राहाणेस गेली. हिंदु मॅरेज पिटीशन क्र.३१०/२०२२ मध्ये अर्जदार क्र. १ व २ यांनी एकमेकांचे साहित्य परत दिलेले आहे व प्रस्तुत अर्जदार यांनी वि.प. यांचेकडुन मिळणा-या दिवाणी व फौजदारी पोटगीचा हक्क तसेच त्यांचे स्थावर व जंगम मिळकतीतील भविष्यकाळातील व भुतकाळातील हक्क कायमपणे व स्वखुशीने सोडुन दिलेला आहे असे शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार हिला पोटगी मागणेचा कोणताही हक्क व अधिकार राहिलेला नाही. वि.प. यांनी अर्जदार हिचा कधीही छळ केलेला नाही. या सर्व कारणांमुळे वि.प. यांनी सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रकरणात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.डी.म्हांगोरे व वि.प. तर्फे विधिज्ञ श्री.एस.ए.सातपुते यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, अर्जदार व वि.प. तर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचा, योग्य त्या ठिकाणी संदर्भ घेण्यात आलेला आहे.

०५. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणमीमांसेसह नोंदवत आहे.

| | **प्रश्नबिंदू** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार ही स्वतःचे वि.प. क्र.१ यांच्यासोबतचे कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे शाबीत करते का ? | : | होकारार्थी. |

२. वि.प. यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे का ? : होकारार्थी.

३. अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळवण्यास हक्कदार आहे का? : अंशतः होकारार्थी

४. आदेश काय ? : अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा.

### प्रश्नबिंदू क्र.१ करिता कारणे: (कौटुंबिक नातेसंबंध)

०६. अर्जदार तर्फे विधिज्ञ श्री .व्ही.डी.म्हांगोरे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा विवाह झाला असून अर्जदार सोनाली ही वि.प. यांचेकडे नांदण्यास गेल्या नंतर ती वि.प.क्र.१ बरोबर प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्षपणे संसार करत होती. वि.प.क्र.१ आकाश याने आपल्या म्हणण्यामध्ये त्यांचा अर्जदार सोबत विवाह झाला असल्याचे मान्य केले आहे. तसेच वि.प. यांनी अर्जदार ही वि.प.क्र.१ यांचेकडे नांदणेस आल्याचे मान्य केलेले आहे. याउलट वि.प. यांनी निशाणी क्र.१६ वर आपला लेखी युक्तीवाद दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. वि.प. यांचे अर्जदारासोबत केव्हाही कौटुंबिक नाते नव्हते, असा युक्तीवाद वि.प. यांनी केलेला आहे.

०७. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम चे कलम २(फ) नुसार ''कौटुंबिक नातेसंबंध'' म्हणजे दोन व्यक्तीमधील नातेसंबंध जे एकत्र राहत होते किंवा कोणत्याही विशिष्ट वेळी एकत्रितपणे वापरत असलेल्या घरात एकत्र राहत होते व त्यांचे नाते संबंध, विवाह किंवा विवाहाच्या स्वरूपातील नातेसंबंध, दत्तक किंवा एकत्र कुटूंबातील सदस्य म्हणून राहत असतील असे नातेसंबंध.

०८. अर्जदार हिच्या कथनांनुसार, तिचा व वि.प.क्र.१ यांचा विवाह झाला असून अर्जदार सोनाली ही वि.प. यांचेकडे नांदण्यास गेल्या नंतर ती वि.प.क्र.१ बरोबर

प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्षपणे संसार करत होती. वि.प.क्र.१ आकाश याने आपल्या म्हणण्यामध्ये त्यांचा अर्जदार सोबत विवाह झाला असल्याचे मान्य केले आहे. तसेच वि.प. यांनी अर्जदार ही वि.प.क्र.१ यांचेकडे नांदणेस आल्याचे मान्य केलेले आहे.

०९. वरील कलमांचे वाचन केले असता प्रस्तुत प्रकरणी अर्जदार सोनाली ही वि.प. यांच्या घरी एकत्र कुटूंबातील सदस्य म्हणून राहणे गरजेचे आहे. वि.प. यांनी आपल्या कथनात अर्जदार सोनाली ही त्यांचेकडे नांदण्यास होती हे मान्य केलेले आहे म्हणजेच अर्जदार ही वि.प. यांच्या घरी एकत्र राहिलेली आहे. सदर बाबीवरून त्यांचे एकमेकांशी कौटुंबिक नातेसंबंध होते हे शाबीत होते. करिता मी प्रश्नबिंदू क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>प्रश्नबिंदू क्र.२ करिता कारणे:</u> (कौटुंबिक हिंसाचार)**

१०. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री .व्ही.डी.म्हांगोरे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराचा वि.प.क्र.१ सोबत विवाह झालेनंतर वि.प. यांनी कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार हिचा वेळोवेळी शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ केला आहे. वि.प.क्र.१ व २ यांनी अर्जदार यांना माहेरकडुन रक्कम रु.५,००,०००/- घेवुन येण्याचा तगादा लावला होता. तसेच वि.प.क्र.१ यांनी अर्जदार हिचेवर घटस्फोटासाठी दबाव टाकला. तसेच वि.प.क्र.१ ने दि.१३/०८/२०२२ रोजी कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय अर्जदार हिचा त्याग केला. तसेच अर्जदार व तिचे माहेरील कुटुंबियांच्या जिवीतास धोका निर्माण केला आहे. वि.प.क्र.१ च्या दहशतीमुळे सध्या अर्जदार ही तिच्या मामाकडे मौजे पुष्पनगर, ता. भुदरगड येथे वास्तव्यास येणे भाग पडले आहे.

११. अर्जदारतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, वि.प. यांनी अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास देवून तिच्या उदरनिर्वाहाची उपेक्षा केलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. याउलट वि.प.तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, वि.प. यांनी कोणत्याही प्रकारचा शारीरिक व मानसिक त्रास अर्जदारांना दिलेला नाही.

१२. वि.प. यांनी निशाणी क्र.१० वर लेखी युक्तीवाद दाखल करुन वि.प. यांनी अर्जदार हिचा केव्हाही कौटुंबिक हिंसाचार केला नसल्याचे कथन केलेले आहे. अर्जदार व वि.प.क्र.१ यांच्या स्वइच्छेने घटस्फोट अर्ज न्यायालयात करण्यात आलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदार हिने आपला पोटगीचा हक्क सोडुन दिलेला आहे.

१३. अधिनियमाचे कलम २(ग) नुसार कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येमध्ये शारिरीक, लैंगिक, शाब्दिक, भावनिक, आर्थिक, हुंड्याच्या संबंधी सतावणे व मुलांच्या बाबतीतली केलेली हिंसा सदर व्याख्येमध्ये समाविष्ट होते.

१४. वि.प.क्र.१ आकाश याची आपल्या पत्नीस सांभाळण्याची नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे. मान्य परिस्थिती नुसार अर्जदार ही आपल्या नवऱ्यापासून वेगळी राहते. वास्तविक कायद्यातील स्थापित न्यायतत्वांनुसार पतीने त्याच्या पत्नीचा सांभाळ करणे हे त्याचे कर्तव्य आहे. परंतु, आपल्या पत्नीच्या उदरनिर्वाहाची वि.प. आकाश याने कोणत्या प्रकारे सोय केलेली आहे ? या बाबत कोणताही पुरावा सद्यःस्थितीमध्ये अभिलेखावर दिसून येत नाही. तसेच घटस्फोट अर्ज जरी खरा समजला तरी सदर अर्जामध्ये अर्जदार हिल उदरनिर्वाहाकरीता किती पोटगीची रक्कम दिलेली आहे, याबाबत कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी वि.प. यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन येत आहे.

१५. वि.प. तर्फे निशाणी क्र.१७ वर मा. वरिष्ठ न्यायालयाचे न्यायनिवाडे दाखल केलेले आहेत.

1. Kaviraj Dattatray Muslonkar Versus Rachana Kaviraj Muslonkar and Another [2017 DGLS(Bom.)814]
2. Madhusudan Bhardwaj and Ors. Versus Mamta Bhardwaj [2009 DGLS(M.P.) 168]
3. Sunil Gangadhar Kadam Versus Jayashri Sunil Kadam [Criminal Revision Application No.233/2018]

१६. वरील न्यायनिवाड्यांचे अवलोकन केले असता, मा. उच्च न्यायालय, मुंबई, मा. उच्च न्यायालय, मध्यप्रदेश यांनी असे निर्देशित केलेले आहे की, जर पतीने आपल्या पत्नीचा कौटुंबिक हिंसाचार केला नसेल तर पत्नी ही अंतरिम पोटगी व अंतिम पोटगी मिळणेस हक्कदार नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये वि.प.क्र.१ ने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणत्याह प्रकारे सोय केलेली नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी या न्यायालयाचे मत आहे की, अर्जदार ही कौटुंबिक हिंसाग्रस्त व्यक्ती आहे. परिणामतः मी प्रश्नबिंदू क्र.२ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>प्रश्नबिंदू क्र.३ व ४ करिता कारणे:</u> (अंतरिम पोटगी व आदेश)**

१७. मान्य परिस्थितीनुसार वि.प.क्र.१ आकाश याचे नैतिक व कायदेशिर कर्तव्य आहे की, त्याने आपल्या पत्नीला सांभाळले पाहिजे. सद्य स्थितीत अर्जदार ही वेगळी राहाते. साहजिकच तिला तिचा चरितार्थ चालविण्याकरीता खर्च होत असेल. त्यामुळे दोन्ही पक्षांचा आर्थिक, सामाजिक दर्जा, सध्याच्या महागाई दराचा विचार करता, अर्जदार हिला रक्कम रु.५,०००/- इतकी रक्कम अंतरिम पोटगी रक्कम म्हणून पुरेशी आहे.

१८. वि.प. तर्फे निशाणी क्र.१६ वर लेखी युक्तीवाद दाखल करुन असे कथन करण्यात आले की, वि.प. व अर्जदार यांनी स्वइच्छेने घटस्फोटाकरीता न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. सदरच्या प्रकरणात अर्जदार हिने पोटगीचा हक्क सोडुन दिलेला आहे. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळवण्यास पात्र नाही. याउलट अर्जदारतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सदर घटस्फोटाचा अर्ज हा वि.प. यांनी अर्जदार हिच्यावर दबाव टाकुन दाखल केलेला आहे.

१९. प्रस्तुत प्रश्नबिंदु निकाली काढणेकरीता सद्य स्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा Ramchandra Laxman Kamble Vs. Shobha Ramchandra Kamble [Writ Petition 3439 of 2016] केसमधील न्यायनिवाडा पाहणे गरजेचे आहे. प्रस्तुत न्यायानिवाड्यामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी असे निर्देशित केले आहे की, जरी पत्नीने स्वइच्छेने पोटगीचा हक्क सोडण्याबाबत करार केला असेल तरी सदरचा करार

हा सार्वजनिक धोरणाच्या विरोधात आहे व सदरचा करार अंमलात आणता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात जरी अर्जदार हिने पोटगीचा हक्क स्वइच्छेने सोडुन दिलेला आहे असे म्हटले तरी सदरचा करार हा सार्वजनिक धोरणाच्या विरोधात आहे व तो अंमलात आणता येणार नाही.

२०. परिणामतः वरील सर्व कारणांमुळे मी प्रश्नबिंदु क्र.३ ला अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो. तसेच, अभिलेखावर अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला पोटगी आदेश न देण्याबाबत कोणतेही कारण दिसून येत नाही. परिणामतः न्यायाचे उद्दीष्ट पार पाडण्यासाठी प्रश्नबिंदू क्र.४ ला खालील आदेश पारित करतो:

## आदेश.

१. अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो.

अ. वि.प. क्र.१ ने अर्जदार हिला अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रु.५,०००/- (रक्कम रु.पाच हजार मात्र) अर्ज दाखल तारखेपासून द्यावे.

ब. अर्ज दाखल तारखेपासूनची आजपर्यंतच्या कालावधीची अंतरिम पोटगी रक्कम ही वि.प. क्र.१ यांनी अर्जदार यांना प्रस्तुत आदेश तारखेपासून पुढील सहा महिन्यांमध्ये समान सहा हप्त्यांमध्ये द्यावी.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च मूळ अर्जामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.06.23 13:02:59 +0530

**( व्ही. बी. मुल्ला )**

दि. २२/०६/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी